ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणेबाबत.
(श्री मनिष माधवराव लोखंडे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-कौडगाव/जांब, ता. अहिल्यानगर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२९५/२०२६
दिनांक- स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ - १.या कार्यालयाचे ज्ञापन क्र.ग्रापं-३/२२९६३७०/२०२६,दिनांक १०/०४/२०२६.
२.या कार्यालयाकडील सेवानिलंबन आदेश क्र.ग्रापं-३/२२९६३६६/२०२६, दि.१०/०४/२०२६.
३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(५)
५. शासन निर्णय क्र.निप्रआ११२२/प्र.क्र.०९/विचौ२/२०२५,दिनांक २२ एप्रिल २०२५.

संदर्भ क्रमांक ०२ चे आदेशान्वये श्री मनिष माधवराव लोखंडे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-कौडगाव/जांब, ता.अहिल्यानगर येथे कार्यरत असताना त्यांनी त्यांचे ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कर्तव्यात कसुर केल्याने तसेच ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.०१ चे ज्ञापनान्वये श्री मनिष माधवराव लोखंडे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-कौडगाव/जांब, ता.अहिल्यानगर यांचे गैरवर्तनाबाबत एकूण ०५ दोषारोप ठेवून शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु केलेली आहे. त्याबाबतचे दोषारोपपत्र त्यांना बजावण्यात आलेले आहेत.

संदर्भ क्रमांक ५ चे शासन निर्णयानुसार श्री मनिष माधवराव लोखंडे सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा यांचा निलंबन कालावधी हा तीन महिन्यांपेक्षा अधिक झालेला असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री मनिष माधवराव लोखंडे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-कौडगाव/जांब, ता. अहिल्यानगर यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती --नेवासा------------------------------ येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री मनिष माधवराव लोखंडे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-कौडगाव/जांब, ता. अहिल्यानगर यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय, पुढील सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल. जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित आदेशाची नोंद, श्री मनिष माधवराव लोखंडे, सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात संबंधित खातेप्रमुख यांनी घ्यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०५०६०९९२ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 05-08-2026 19:18:31
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्री मनिष माधवराव लोखंडे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-कौडगाव/जांब, ता.अहिल्यानगर (सेवानिलंबन मुख्यालय पंचायत समिती श्रीगोंदा)
द्वारा :- गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा.
२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबतची पोहोच कार्यालयास सादर करावी.
३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर/श्रीगोंदा यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती ---नेवासा---------
३/- श्री मनिष माधवराव लोखंडे, सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर अहवाल इकडेस सादर करावा.